## -: प्रेसनोट दिनांक- ३०/०७/२०१९ :-

विष्णु चंद्रकांत कुंभार, वय-४७, मंडळ अधिकारी, बिद्री, ता. कागल व दिगंबर आनंदा गुरव,कोतवाल-बिद्री,ता. कागल ा.**कागल यांनी लाच मागणी केलेबाबत**

---

यातील तक्रारदार व फिर्यादी यांनी त्यांचे .पत्नीचे नावे बिद्री गावामध्ये १५ गुंठे शेतजमिन दुय्यम निबंधक मुरगूड कार्यालय येथून रजिस्टर दस्ताद्वारे खरेदी केली आहे. सदर शेतजमिन खरेदी केल्यानंतर जमिनीचे अधिकार अभिलेखात नाव नोंद होवून नविन ७/१२ उतारा मिळणेसाठी आवश्यक सर्व कागदपत्रांसह तक्रारदार यांनी त्यांचे पत्नीचे नावे तलाठी श्री.वाडकर, बिद्री सजा यांचेकडे रितसर अर्ज दिला होता. त्यानंतर तलाठी बिद्री यांनी तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या जमिनीचे ७/१२ पत्रकी तक्रारदार यांचे पत्नीचे नाव नोंद होणेसाठी ऑनलाईन नोंद घेवून ती नोंद मंजूर होणेकरीता मंडळ अधिकारी बिद्री यांचेकडे पाठविली होती. तक्रारदार यांनी सदरबाबत वेळोवेळी मंडळ अधिकारी बिद्री भेट घेतली होती. परंतू त्यांनी ऑनलाईन डायरी नोंद मंजूर केली नव्हती. त्यासाठी त्यांनी मंडळ अधिकारी बिद्री कार्यालयातील कोतवाल दिगंबर गुरव यांचेमार्फत रु.३,०००/- लाचेची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी दि. १३/०५/२०१९ रोजी तक्रारी अर्ज दिला होता.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दिनांक १४/०५/२०१९ रोजी मंडळ अधिकारी कार्यालय,बिद्री येथे शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये तक्रारदार यांचेकडे मंडळ अधिकारी कुंभार यांनी ऑनलाईन डायरी नोंद मंजूर करणेसाठी त्यांचे इच्छेप्रमाणे रक्कम देणेची मागणी केली. तसेच कोतवाल दिगंबर गुरव यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांनी खरेदी केलेल्या जमिनीचे ७/१२ पत्रकी त्यांचे पत्नीचे नाव नोंद होणेसाठी तलाठी वाडकर यांनी ऑनलाईन डायरी नोंद घातलेबाबत त्यांचेकरीता रु. १,०००/- व कुंभार यांनी ऑनलाईन डायरी नोंद मंजुर करणेसाठी रु. १,०००/- लाच मागणी केलेचे निष्पन्न झाले.

त्यानुसार तत्कालीन पोलीस उपअधीक्षक श्री. गोडे यांनी स्टाफ व पंचासह मंडळ अधिकारी कार्यालय, बिद्री येथे सापळा कारवाई आयोजित केली असता, मंडळ अधिकारी कुंभार व कोतवाल गुरव यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारलेली नाही. सदरबाबत मुळ तक्रारदार व फिर्यादी यांचे फिर्यादीवरून आलोसे १) विष्णु चंद्रकांत कुंभार, मंडळ अधिकारी, बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर, २) दिगंबर आनंदा गुरव, कोतवाल - बिद्री, ता. कागल, जिल्हा-कोल्हापूर यांचेविरुध्द मुरगूड पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, पोहेकॉ मनोज खोत, पोना नवनाथ कदम, पोकॉ मयुर देसाई, चालक पोहेकॉ-सुरज अपराधव व विष्णु गुरव, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मं.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.

५)व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३: